(सोबत शासन, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय यांचे ' सन 2018 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 17- महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याचा पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000' यात सुधारणा करण्याकरिता अध्यादेश दि. 24.06.2018 प्रत जोडत आहे.)

क्रमांक:- 10/एडीएम/पदविका/2018/६३२
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिक मार्ग, पत्रपेटी क्र. 1967,
मुंबई - 400 001.
दिनांक:- 25 JUN 2018

**प्रत:- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:**

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे यांना कळविण्यात येते की, सदर अध्यादेश आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणुन सदर अध्यादेशानुसार कार्यवाही करण्यास कळवावे, ही विनंती.

2. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व संस्था/कार्यालये प्रमुखांच्या निदर्शनास आणावे, ही विनंती.

3. कार्यासन क्र. 3, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर अध्यादेश या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

(डॉ. सुरेश यावलकर)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

E:\N.A\Note\note to 3 & return to other desk.doc

RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक ३८] रविवार, जून २४, २०१८/आषाढ ३, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ७०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७.—** महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यात सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. .. .. १-४

**आदिवासी विकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ जून २०१८.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XVII OF 2018.**

*AN ORDINANCE*

TO AMEND THE MAHARASHTRA SCHEDULED CASTES, SCHEDULED TRIBES, DE-NOTIFIED TRIBES (VIMUKTA JATIS), NOMADIC TRIBES, OTHER BACKWARD CLASSES AND SPECIAL BACKWARD CATEGORY (REGULATION OF ISSUANCE AND VERIFICATION OF) CASTE CERTIFICATE ACT, 2000.

**सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७.**

**महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यात सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

२००१ चा महा. २३. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या

पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यात सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१८ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ यात नवीन कलम ४क समाविष्ट करणे.

२. महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० याच्या कलम ४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :- २००१ चा महा. २३.

२०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षासाठी विवक्षित व्यावसायिक पाठ्यक्रमांमधील प्रवेशासाठी तात्पुरत्या तरतुदी.

"**४क .** (१) या कलमाच्या तरतुदी, २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षासाठी व्यावसायिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशासंबंधात लागू होतील.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जाती प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्ती आणि ज्या व्यक्तीने आपल्या किंवा तिच्या वतीने शैक्षणिक संस्थेकडून तिच्या जाती प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी व वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी अर्ज केलेला असेल आणि तो अर्ज पडताळणी समितीसमोर प्रलंबित असेल तर, ती व्यक्ती पुढील शर्तींना अधीन राहून जाती प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी पात्र असेल :-

(एक) ती, वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी पडताळणी समितीकडे तिने अर्ज केला असल्याचा किंवा तिच्या वतीने पडताळणी समितीकडे अर्ज केला असल्याबाबतचा पुरावा सादर करील.

(दोन) ती, राज्य शासनाशी विचारविनिमय करून, प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी तिचे वैधता प्रमाणपत्र प्रवेश प्राधिकरणाकडे सादर करील :

परंतु, खंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेला दिनांक हा, २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षासाठी संबंधित व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या प्रवेशासंबंधात प्रवेश प्रक्रिया समाप्त होण्याच्या दिनांकापूर्वीचा असेल.

(३) तिने पोट-कलम (२) अन्वये प्रवेश नियामक प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या अशा दिनांकापूर्वी वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केली असेल तर, राखीव जागेवर मिळवलेला तात्पुरता प्रवेश, कोणताही असल्यास, तो रद्द झाला असल्याचे मानण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) मधील कोणत्याही गोष्टीचा, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार, खुल्या प्रवर्गामधून व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या प्रवेशासाठी अशी व्यक्ती पात्र आहे असा विचार करण्यास संबंधित प्राधिकरणास प्रतिबंध होत आहे, असा अर्थ लावण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण.-** या कलमाच्या प्रयोजनांसाठी,-

(एक) "प्रवेश प्रक्रिया" याचा अर्थ, व्यावसायिक पाठ्यक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया, असा आहे;

२०१५ चा महा. २८. (दोन) "व्यावसायिक पाठ्यक्रम" याचा अर्थ, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ किंवा त्यावेळी अंमलात असणारा कोणताही इतर कायदा याच्या तरतुदींन्वये व्यावसायिक पाठ्यक्रम म्हणून अधिसूचित केलेला शैक्षणिक अभ्यास पाठ्यक्रम, असा आहे;

(तीन) "प्रवेश नियामक प्राधिकरण" याचा अर्थ, २०१५ चा उक्त अधिनियम याच्या तरतुदींन्वये शासनाने घटित केलेले प्राधिकरण, असा आहे. ".

## निवेदन

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गातील (थोडक्यात "राखीव प्रवर्ग") व्यक्ती यांना जातीचे प्रमाणपत्र देणे व अशा प्रमाणपत्राची पडताळणी करणे या बाबींचे विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा. २३) अधिनियमित करण्यात आला आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (२) मध्ये राखीव प्रवर्गाचे लाभ घेण्यास इच्छुक असणारी कोणतीही व्यक्ती, सक्षम प्राधिकाऱ्याकडून त्याला मिळालेल्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी आणि वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी पडताळणी समितीकडे अर्ज करील, अशी तरतूद आहे.

२. राज्यातील विविध व्यावसायिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाची प्रक्रिया नजीकच्या काळात लवकरच पूर्ण होण्याची शक्यता आहे. राज्य शासनाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, एकतर ज्यांना जाती प्रमाणपत्र मिळालेले आहे अशा विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या पडताळणीसाठीची आणि वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही किंवा ज्यांच्या वतीने संबंधित शैक्षणिक संस्थांनी, संबंधित पडताळणी समितीकडे दाखल केलेले पडताळणीसाठीचे आणि वैधता प्रमाणपत्र देण्याबाबतचे अर्ज मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत. परिणामी, मोठ्या संख्येने विद्यार्थी, त्यांनी दावा केलेल्या जातीच्या आधारे व्यावसायिक पाठ्यक्रमात प्रवेश घेऊ शकत नाहीत, असे राज्य शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे.

३. म्हणून, पडताळणी समितीकडे वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी अर्ज केला असल्याचा पुरावा सादर करून त्या आधारे, अशा व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना परवानगी देण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा. २३) यात तात्पुरत्या स्वरूपात तात्काळ सुधारणा करणे इष्ट वाटते. असा विद्यार्थी, प्रवेश नियामक प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर करील तर, अशा विद्यार्थ्याने राखीव प्रवर्गातून मिळवलेला तात्पुरता प्रवेश, कोणताही असल्यास, रद्द झाला असल्याचे मानण्यात येईल, अशी तरतूद करणे देखील इष्ट वाटते. प्रस्तावित तरतुदींची अंमलबजावणी फक्त २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षासाठी निर्बंधित करण्याचे प्रस्तावित केले आहे.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा. २३), यात सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे; म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई,
दिनांक २३ जून २०१८.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनिषा वर्मा,**
शासनाच्या प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.